# प्रकरण चौथे

---

## श्री गाडगे महाराज मिशनचे नेतृत्व

# प्रकरण चौथे

# श्री गाडगे महाराज मिशनचे नेतृत्व

श्री संत गाडगे महाराज हे महाराष्ट्रातील कृतीशील संत होते. त्यांनी समाजसेवेचे कार्य करण्यासाठी अनेक सामाजिक व धर्मादाय संस्था स्थापन केल्या. या सर्व संस्थांना संघटीतरूप देण्यासाठी त्यांनी सन १९५२ मध्ये मुंबई येथे 'श्री संत गाडगे महाराज मिशन' या सेवाभावी संस्थेची स्थापना केली. समाजातील दुर्बल घटकांची प्रगती करणे हे मिशनचे उद्दिष्ट होते. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व मिशनच्या विकासासाठी त्यांनी कार्यकुशल अशा नेतृत्वाची निवड केली होती. मिशनचे नेतृत्व करणाऱ्या मंडळींनी गाडगेबाबांच्या भूकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांनां पाणी, उघडया-नागडयांना वस्त्र, गोर-गरीब मुला-मुलींना शिक्षण, अंध-पंगु रोग्यांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, गरीब तरूण-तरूणींचे विवाह, पशु-पक्षी मुक्या प्राण्यांना अभय, दु:खी निराशांना हिंमत हे १० संदेश पायाभूत मानले. या संदेशानुसार कार्य करण्यासाठी मिशन नेतृत्वाने गेल्या ५० वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात आदिवासी आश्रमशाळा, विमुक्तजाती आश्रमशाळा, धर्मशाळा, वसतिगृहे, निराधार बालकाश्रम, कन्या छात्रालये, वृद्धाश्रम इत्यादी वेगवेगळ्या प्रकारच्या शाखा-उपशाखा स्थापन केल्या.या मिशन संचलित सर्व शाखा-उपशाखांच्या प्रगतीसाठी स्थानिक नेतृत्वाची नियुक्ती केली.

प्रस्तुत प्रकरणात श्री गाडगे महाराज मिशनच्या नेतृत्वाचा अभ्यास करणे सोयीचे व्हावे या दृष्टीने मिशन नेतृत्वाचे केंद्रीय नेतृत्व व स्थानिक नेतृत्व असे दोन विभाग करून त्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

## मिशनचे केंद्रीय नेतृत्व :

गाडगे महाराज मिशन ही सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणारी महाराष्ट्रातील एक प्रमुख संस्था आहे. या संस्थेचे सन १९५२ पासून आजपर्यंत अखंडपणे कार्य सुरू आहे. या संस्थेचा कार्यविस्तार प्रचंड आहे. हा कार्यविस्तार

होण्यास गाडगे महाराज मिशनला लाभलेले प्रभावी केंद्रीय नेतृत्व कारणीभूत आहे. मिशनचे मुख्यालय मुंबई या ठिकाणी आहे. मिशनचे नेतृत्व अनेक थोर व्यक्तींनी केलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने गाडगेबाबांचे सानिध्य लाभलेले दादासाहेब देशमुख, यशवंतराव कृष्णाजी माने, विश्वनाथ काशिनाथ वाघ, यशवंतराव तुकाराम शिंदे, राजाराम सुखदेव घोंगटे, कडुबुवा चौधरी, मालोजीराजे नाईक निंबाळकर, गुणवंतराच चऱ्हाटे, जी.डी.तपासे, जिजाबा कोंडिबा मोहिते, तुकाराम धोंडिबा खांडवे, एकनाथ जगन्नाथ ठाकूर इत्यादी व्यक्तींचा उल्लेख अटळ आहे. या सर्व व्यक्तींनी गाडगेबाबांच्या पश्चात गाडगे महाराज मिशनच्या नेतृत्वाची धुरा अतिशय प्रभावीपणे सांभाळली.

**श्री दादासाहेब देशमुख :**

श्री संत गाडगे महाराज यांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्राला भूषणावह आहे. अशा महान संतश्रेष्ठीने उभारलेल्या गाडगे महाराज मिशनचे पहिले अध्यक्ष अच्युतराव गुलाबराव उर्फ दादासाहेब देशमुख हे होते. दादासाहेब देशमुख यांच्यात अंगभूत सेवाभावी नेतृत्वाचे गुण असल्याचे गाडगेबाबांनी ओळखले होते. त्यामुळे गाडगेबाबांनी त्यांची सन १९५४ मध्ये मिशनच्या अध्यक्षपदी निवड केली. दादासाहेब देशमुख यांचा जन्म १३ जानेवारी १९०९ रोजी अकोला जिल्हयातील मुर्तिजापूर तालुक्यातील सिरसो या गावी झाला. दादासाहेबांचे १० वय वर्षे असतानाच वडील वारल्यामुळे दादासाहेब निराधार झाले. तरी आईच्या पाठींब्याने त्यांनी कसेबसे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.[१]

श्री दादासाहेब देशमुख कीर्तनाच्या माध्यमातून गाडगेबाबांच्या सानिध्यात आले. गाडगेबाबांनी दादासाहेबांच्या गावी आल्यानंतर त्याच्या घरची सिरसो त्यांच्याच गावच्या गणपतराव हरणे यांच्याजवळ विचारपूस केली. त्यानंतर गाडगेबाबांनी दादासाहेब देशमुख यांच्या आईची भेट घेतली आणि सांगीतले की, तुमच्या मुलाला माझ्याबरोबर घेऊन जातो आणि पंढरपूर येथील मराठा धर्मशाळेत भांडी देण्याचे काम सोपवितो. त्याप्रमाणे सुरूवातीस गाडगेबाबांनी धर्मशाळेत भांडी देण्याचे काम सोपविले.

अशाप्रकारे त्यांनी दादासाहेब देशमुख यांच्या सामाजिक कार्याचा आरंभ झाला. त्यांनी आयुष्यभर गाडगेबाबांच्या समवेत सामाजिक कार्य केले.[२]

दादासाहेब देशमुख यांनी पंढरपूर मराठा येथील धर्मशाळेत १९२६ ते १९२८ सालापर्यंत काम केले. नंतर गाडगेबाबांनी नाशिक येथील धर्मशाळेच्या बांधकामावर देखरेख करण्यासाठी त्यांना पाठविले. तसेच दादासाहेबांनी आळंदी, वरवंडी व इतर काही संस्थांमध्ये कार्य पाहिले. दादासाहेबांनी अनेक वर्षे गाडगेबाबांचा पत्रव्यवहार सांभाळण्याचे कार्य केले. दि.२० डिसेंबर १९५६ मध्ये गाडगेबाबांचा मृत्यू झाला. त्यावेळी दादासाहेब देशमुख गाडगेबाबांच्या सोबत होते.[३]

श्री संत गाडगेबाबांच्या महानिर्वाणानंतर श्री गाडगेबाबांनी स्थापन केलेल्या १५४ शाखांचे प्रमुख विश्वस्त म्हणून दादासाहेब देशमुख यांनी काम पाहिले. श्री गाडगे महाराज मिशनचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी प्रथम श्री गाडगे महाराज समाधी मंदिराचे काम सुरू केले. त्यासाठी त्यांना स्वर्गीय रघुनाथसिंह राठोड यांचेकडून मोलाचे सहकार्य मिळाले आणि अमरावतीस गाडगेबाबांचे प्रशस्त असे समाधिस्थळ उभारले. त्याठिकाणी अंध, पंगु, कुष्ठरोगी लोकांना अन्नदान, वस्त्रदान, औषधोपचार सुरू केले. त्यासाठी धर्मादाय देणग्या मिळविण्यासाठी पुढाकार घेतला. आजही या ठिकाणी अन्नदान व वस्त्रदान सुरू आहे.[४]

दादासाहेब देशमुख हे इ.स.१९५४ ते १९९० असे एकूण ३६ वर्षे मिशनचे अध्यक्ष होते. या कालखंडात त्यांनी आपल्या प्रभावी नेतृत्वाने मिशनचा प्रचंड शाखा विस्तार घडवून आणला.[५] या काळात अनेक प्राथमिक आश्रमशाळा, आदिवासी आश्रमशाळा, पोस्टबेसिक विद्यालये, वृद्धाश्रम, पाळणाघरे, मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी वसतिगृहे अशा स्वरूपाच्या सुमारे ८२ शाखा उपशाखा सुरू झालेल्या दिसून येतात.[६]

दादासाहेब देशमुख यांनी गाडगे महाराज मिशनच्या अध्यक्षपदी असताना सर्वात उल्लेखनीय कार्य सन १९७१ मध्ये केले. ते म्हणजे गाडगे महाराज मिशनची घटना दुरूस्ती होय. त्यासाठी त्यांनी दि.१.६.१९७१ रोजी गाडगे महाराज मिशनच्या

पदाधिकाऱ्यांची मिटिंग घेतली. या मिटिंगमध्ये त्यांनी श्री.यशवंतराव माने, श्री.विश्वनाथ वाघ, गुणवंतराव चऱ्हाटे, जिजाबा मोहिते, राजाराम धोंगटे, ओंकारनाथ जोशी, जी.डी.तपासे, प्रभाकर गणपत जाधव, एस.डी.जाधव इत्यादी पदाधिकाऱ्यांशी सखोल चर्चा करून मिशनच्या मूळ घटनेत काळानुरूप अमूलाग्र बदल घडवून आणले. मिशनच्या घटनादुरूस्तीनुसार त्यांनी मिशनची व्याख्या काय? मुख्य कचेरी कोठे? मिशनचा विस्तार कोणकोणत्या ठिकाणी केला जाईल? मिशनची बदलती ध्येयधोरणे कोणती? हितचिंतक, प्रचारक, आजीवसेवक कोणास म्हणावे इत्यादी बाबी ठरविल्या. तसेच सर्व साधारण समिती, विश्वस्त मंडळ, केंद्रीय कार्यकारी मंडळ, त्यांची निवड पद्धती, शाखा विश्वस्तांची कार्ये कोणती हे निश्चित केले. त्यामुळे मिशन प्रशासनामध्ये अमूलाग्र बदल घडून आला आणि मिशन प्रशासनास गती मिळाली.[७]

दादासाहेब देशमुख यांनी आयुष्यभर कोणत्याही व्यक्तीस दुखावले नाही. त्यांनी सर्वांना प्रेमळपणाची व सहकार्याची वागणूक देऊन त्यांचा मिशन सेवाकार्यासाठी उपयोग करून घेतला. त्यांनी श्री गाडगे महाराज मिशनला सर्व आयुष्य समर्पित केले होते. दारूबंदी, हिंसाबंदी, शिक्षणप्रसार, अंधश्रद्धा निमुर्लन इत्यादीसाठी अखंडपणे कार्य केले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून 'भारत शिक्षण संस्था मुंबई' या संस्थेने त्यांना 'श्री संत शिरोमणी गाडगेबाबा' पुरस्कार दिला. तसेच त्यांना डॉ.श्रीराम लागू व निळू फुले यांच्या हस्ते 'सामाजिक कृतज्ञता' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. गाडगेबाबांनी सुरू केलेल्या सामाजिक कार्यात त्यांनी इ.स.१९२६ ते २००२ पर्यत एकूण ७३ वर्षे सेवाभावीवृत्तीने कार्य केले. दि.१३ जानेवारी २००२ रोजी त्यांना देवाज्ञा झाली.[८]

### श्री.यशवंतराव कृष्णाजी माने :

यशवंतराव कृष्णाजी माने हे मुळचे सातारा जिल्हयातील माण तालुक्यातील गोंदवले बु॥ या गावचे. त्यांचा जन्म इ.स.१९१६ मध्ये झाला. घरची परिस्थिती बेताचीच होती. तरी त्यांच्या वडिलांनी त्यांना शिक्षणासाठी मुंबई येथे पाठवले. यशवंतराव माने मुंबईला शिक्षण घेत असताना एकदा आषाढी वारीसाठी पंढरपूरला आले

होते. तिथे योगायोगाने त्यांनी गाडगेबाबांचे कीर्तन ऐकले. त्या कीर्तनाचा मानेबाबांच्या मनावर इतका परिणाम झाला की, ते काही काळ पुन्हा घराकडे वळलेच नाहीत. ते गाडगेबाबांच्या सांगण्यावरून एकोणिसशे बेचाळीसच्या 'छोडो भारत' अंदोलनात सहभाग घेतला होता. त्यांनी काही काळ भूमिगत होऊन महाराष्ट्रभर कार्य केले. त्यामुळे त्यांना सरकारने हद्दपारीची नोटीस बजावली होती.[९]

इ.स. १९५२ मध्ये गाडगेबाबांनी श्री गाडगे महाराज मिशनची स्थापना केली. या मिशनचे संस्थापक सदस्य म्हणून गाडगेबाबांनी यशवंतराव माने यांची निवड केली.[१०] गाडगेबाबांच्या मृत्यूनंतर गाडगेबाबांच्या कार्याचा वारसा चालविण्यासाठी गोंदवले बु॥ येथे गोर-गरीब, दलित, विमोचित जाती व भटक्या जाती-जमातींच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी सोय करण्यासाठी सन १९५८ मध्ये गाडगेबाबांच्या नावे प्राथमिक आश्रमशाळा सुरू केली. त्यानंतर सन १९६१ मध्ये त्यांनी श्री गाडगे महाराज विमोचित जाती आश्रमशाळा गोंदवले या ठिकाणी सुरू केली. तसेच १९७३ मध्ये पोस्टबेसिक रेसिडेन्सीयल हायस्कूल सुरू केले.[११]

श्री.यशवंतराव माने यांचे महत्वपूर्ण कार्य म्हणजे गाडगे महाराज मिशनच्या सन १९७१ च्या घटना दुरूस्तीच्या वेळी त्यांनी अनेक मूलभूत बदल सुचविले होते. त्यामुळे मिशनच्या प्रशासनामध्ये कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली. नंतरच्या काळात त्यांनी पश्चिम महाराष्ट्रात मिशनचा विस्तार घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच पश्चिम महाराष्ट्रात गाडगे महाराज मिशन, मुंबई. संचलित अनेक शाखा कार्यान्वित झाल्या. यशवंतराव माने यांच्या नेतृत्व, मार्गदर्शन व सहकार्यातून पश्चिम महाराष्ट्रात अस्तित्वात आलेल्या काही शाखांची यादी पुढीलप्रमाणे -

| अ. | शाखा नाव | ठिकाण | स्थापना वर्ष |
|---|---|---|---|
| १ | गाडगे महाराज विमोचित जाती आश्रमशाळा | गोंदवले | १९५८ |
| २ | गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह | गोंदवले | १९५८ |
| ३ | गाडगे बाबा विद्यार्थी वसतिगृह | सातारा | १९६१ |
| ४ | श्री गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा | साखरवाडी | १९७३ |
| ५ | श्री गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा | गोंदवले | १९७३ |
| ६ | श्री गाडगे महाराज माध्यमिक आश्रमशाळा | गोंदवले | १९७३ |
| ७ | श्री गाडगे महाराज बिरोबा विद्यालय | पांगरी | १९८४ |
| ८ | श्री गाडगे महाराज हनुमान विद्यालय | इंजवाव | १९८८ |
| ९ | श्री गाडगे महाराज भैरवनाथ विद्यालय | तोंडले | १९८९ |
| १० | श्री गाडगे महाराज निराधार बालिकाश्रम | गोंदवले | १९८९ |
| ११ | श्री गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह | साखरवाडी | १९९० |
| १२ | श्री गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा | येळेवाडी | १९९६ |
| १३ | श्री गाडगे महाराज केंद्रीय एस.सी. आश्रमशाळा | बिजवडी | २००० |
| १४ | श्री गाडगे महाराज कन्या छात्रालय | गोंदवले | १९९६ |
| १५ | श्री गाडगे महाराज विद्यालय | दानवलेवाडी | १९९६ |
| १६ | श्री गाडगे महाराज बालसदन | येळेवाडी | २००१ |
| १७ | श्री गाडगे महाराज माध्यमिक आश्रमशाळा | साखरवाडी | २००४ |
| १८ | श्री गाडगे महाराज बालसदन | गोंदवले | २००४ |

गाडगे महाराज मिशन संचलित वरील शाखा-उपशाखा स्थापनेत यशवंतराव माने यांचा सिंहाचा वाटा आहे.[१२] त्यामुळे सातारा जिल्हयात मिशनचा कार्यविस्तार मोठया प्रमाणात झालेला दिसून येतो.

श्री. यशवंतराव मानेबाबा हे गाडगे महाराज मिशनचे कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्यावर लहानपणापासून गाडगेबाबांच्या कीर्तनाचा प्रभाव होता. त्यांनी आयुष्यभर कीर्तनाद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य सुरू ठेवले आहे. कीर्तनातून त्यांनी जातीभेद उच्चाटन, अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षणप्रसार, दारूबंदी, हिंसाबंदीचे कार्य केलेले आहे व आजही करीत आहेत. अहिंसा या गाडगे महाराज मिशनच्या तत्वाचा प्रचार करणे हे मिशन नेतृत्वाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साद्य करण्यासाठी यशवंतराव मानेबाबांनी महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे -

| अ. | यात्रा ठिकाण | देवाचे नाव | तालुका | जिल्हा | हिंसाबंदी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | वरखंडी | लक्ष्मीबाई | राहुरी | अहमदनगर | ५००० बकरी |
| २ | मांडणगाव | खाकेबुवा | श्रीगोंदा | अहमदनगर | २००० कोंबडे व बकरी |
| ३ | लोणी | अंबरबुवा | श्रीगोंदा | अहमदनगर | २५० बकरी |
| ४ | मांडरदेवी | काळुबाई | वाई | सातारा | ५००० बकरी |
| ५ | उकडगांव | म्हसोबा | श्रीगोंदा | अहमदनगर | ५०० बकरी |
| ६ | कान्होर | मेसाई | नगर | अहमदनगर | ५० ते ७५ बकरी |

श्री. यशवंतराव मानेबाबांच्या कीर्तन प्रभावामुळे काही काळ वरील ठिकाणी हिंसाबंदी झालेली दिसून येते.[१३]

संत गाडगे महाराज मिशनच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाने यशवंतराव मानेबाबांच्या मिशनमधील प्रदीर्घ अनुभव व सेवा कार्याचा विचार करून इ.स. १९९१ मध्ये त्यांची श्री गाडगे महाराज मिशन, मुंबई. च्या अध्यक्षपदी एकमताने निवड केली. सन १९९१ ते २००० पर्यंत मिशनच्या अध्यक्षपदी होते. मानेबाबांनी अध्यक्षपदी असताना मिशनचे नेतृत्व अत्यंत प्रभाविपणे केले. अध्यक्षपदी असताना १९९१ मध्ये त्यांनी मिशनच्या विकासासाठी काही संकल्प करून त्यांच्या परिपूर्तिसाठी प्रयत्न केले. त्यातील

पहिला संकल्प म्हणजे 'श्री गाडगे महाराज स्मृती धर्मशाळा' स्थापन करणे. यासाठी त्यांनी मुंबई या ठिकाणी सेंटजॉर्ज हॉस्पिटलजवळ भूखंड संपादन केला आणि त्या ठिकाणी त्यांनी गाडगे महाराज स्मृती धर्मशाळा स्थापन केली. या धर्मशाळेत रोगपिडित लोकांची अत्यल्प खर्चात निवाऱ्याची व भोजनाची व्यवस्था केली.

### श्री गाडगेबाबा सेवा पुरस्कार -

समाजतील दीन, दलित, दु:खी, निराधार मुला-मुलींसाठी आणि अंध-पंगू रोगी व्यक्तींसाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी यशवंतराव मानेबाबांनी गाडगे महाराज मिशनमार्फत 'श्री गाडगे महाराज सेवा पुरस्कार' देण्याची प्रथमच सुरूवात केली. त्यामुळे सेवाभावीवृत्तीने कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थाच्या कार्याला चालना मिळाली.[१४] यशवंतराव माने यांच्या नेतृत्व काळात श्री गाडगे महाराज सेवा पुरस्कार देण्यात आलेल्या व्यक्ती व संस्था पुढीलप्रमाणे -

१. विश्वगुर्जरी मा. महफतलालजी शेठ मेहता, मुंबई.

२. श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.

३. मा.बाळासाहेब भारदे, पुणे.

४. रयत शिक्षण संस्था, सातारा. (इ.स.२00३)

वरील संस्थांना व व्यक्तींना श्री गाडगे महाराज सेवा पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे.[१५] यातून यशवंतराव मानेबाबांच्या नेतृत्वाची कल्पकता दिसून येते.

स्त्री ही राष्ट्राची शक्ती व संपत्ती असल्याने मुलींच्या शिक्षणाची अत्यंत गरज आहे. 'एक मुलगी साक्षर झाली तर संपूर्ण कुटुंब साक्षर व संस्कारक्षम बनते' ही जाणीव लक्षात घेऊन शिक्षण प्रवाहापासून वंचित राहणाऱ्या मुलींच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी यशवंतराव मानेबाबांनी पुढाकार घेऊन भानसहिवरे. जि.अहमदनगर येथे नऊ लाख पंचेचाळीस हजार रूपये खर्च करून श्री गाडगे महाराज कन्या आश्रमशाळा सन १९९३ मध्ये सुरू केली.

महाराष्ट्रात ३0 सप्टेंबर १९९३ रोजी लातूर, किल्लारी या भागात भूकंप झाला. त्यामध्ये हजारो लोक मृत्यूमुखी पडले होते. त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याचा निर्णय मिशनचे अध्यक्ष या नात्याने यशवंतराव मानेबाबांनी घेतला. मिशन संचलित शाखा-उपशाखांमधून त्यांनी 'भूकंपग्रस्त सहाय्यक निधी' उभारला आणि त्यांनी मिशनच्या काही पदाधिकाऱ्यांसमवेत भूकंपग्रस्त भागाचा दौरा करून हा निधी भूकंपग्रस्ताकडे सुपूर्त केला.[१६]

श्री यशवंतराव माने हे गाडगे महाराज मिशनच्या कार्यकारी मंडळाचे आजीव सदस्य आहेत. तसेच अनेक धर्मशाळेचे ते विश्वस्त आहेत. त्याच बरोबर त्यांनी मिशनसंचलित काही शाखा - उपशाखांचे संचालक म्हणून यशस्वीपणे कार्य केले आहे.

महाराष्ट्र शासनाने व सामाजिक संस्थानी मानेबाबांच्या कार्याची दखल घेऊन व अनेक पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केलेला आहे.

**यशवंतराव माने यांना मिळालेले पुरस्कार -**

१. 'दलितमित्र'- वर्ष - १९९२ ( महाराष्ट्रशासनाकडून देण्यात आलेला आहे )
२. 'भारतीय विकास लोक कार्यक्रम पुरस्कार' वर्ष १९९२ - ( हा पुरस्कार त्यांना त्यांच्या कीर्तन कार्याबद्दल दिलेला आहे )
३. 'गाडगे महाराज सेवा पुरस्कार'- ( हा पुरस्कार त्यांनी मिशनमध्ये केलेल्या कार्याबद्दल देण्यात आला आहे.)
४. 'माणभूषण' पुरस्कार.
५. श्रीमंत मालोजीराजे सन्मानपत्र.

वरील पुरस्कारांच्या स्वरूपावरून यशवंराव मानेबाबांचे मिशनमधील योगदान व सामाजिक कार्य लक्षात येते. यशवंतराव मानेबाबांनी सन २00८ मध्ये वयाची ९२ वर्षे पूर्ण केलेली आहेत. सध्या ते गाडगे महाराज मिशनचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून पदभार संभाळत आहेत.[१७]



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## श्री. विश्वनाथ काशिनाथ वाघ -

विश्वनाथ काशिनाथ वाघ हे संत गाडगेबाबांचे अनुयायी व थोर स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांचा जन्म ५ जानेवारी १९१६ मध्ये झाला. ते मूळचे अहमदनगरचे होते. त्यांनी वयाच्या १४ व्या वर्षी अहमदनगरला ह.भ.प.घोंगडे बुवांच्या सप्ताहात गाडगेबाबांचे कीर्तन ऐकले आणि मनाचा निश्चय करून गृहत्यागाचा निर्णय घेतला. ते शाळा सोडून आई-वडीलांचा विरोध डावलून गाडगेबाबांच्या बरोबर पंढरपूरला दाखल झाले. गाडगेबाबांच्या बरोबर कीर्तन करत फिरू लागले. श्री गाडगेबाबांच्या ध्येयधोरणानुसार दारूबंदी, अस्पृश्यता, शिक्षणप्रसार, हिंसाबंदी, अंधश्रद्धा या विषयांवर गुजरात, सिंध, कर्नाटक मध्यभारत असे दूरवर कीर्तन करत फिरले. त्यांची कीर्तने खूप रसाळ व प्रबोधनकारी होती. एकदा बडोद्याचे राजे श्रीमंत सयाजीराव गायकवाड वाघबाबांच्या कीर्तनाची ख्याती ऐकून त्यांचे कीर्तन राजवाडयात आयोजित केले होते.[१८] स्वातंत्र्यपूर्वकाळात श्री.वाघबाबांनी आपल्या यथाशक्तीने १९४२ च्या 'छोडो भारत' अंदोलनात हिरीरीने भाग घेऊन ब्रिटिश सरकारविरूद्ध महाराष्ट्रात तुफान प्रचार केला होता.[१९]

श्री संत गाडगे महाराज मिशनच्या स्थापनेत वाघबाबांचे मोलाचे योगदान होते. श्री गाडगेबाबांनी त्यांची संस्थापक सदस्य म्हणून निवड केली होती.[२०] गाडगेबाबांनी इ.स.१९५४ मध्ये महाराष्ट्रातील पहिली आश्रमशाळा राहुरी येथे स्थापन केली होती. या शाळेचे व्यवस्थापक वाघबाबा होते. व्यवस्थापक असताना त्यांनी शाळेच्या इमारतीचे बांधकाम केले. वाघबाबांनी श्री गाडगे महाराज मिशनमध्ये व्यवस्थापक, विश्वस्त, खजिनदार, सचिव, चेअरमन, उपाध्यक्ष, अध्यक्ष इत्यादी विविध पदे भूषविली. त्यांनी जे.जे. धर्मशाळा मुंबई. आणि पंढरपूर धर्मशाळेचे व्यवस्थापक म्हणून अत्यंत कुशलतेने कार्यभार संभाळला होता. विविध संस्था सांभाळताना त्यांचे स्वच्छतेकडे बारकाईने लक्ष असे. तसेच आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी ते सतत

प्रयत्नशील होते. त्यांनी कोणत्याही फळाची अथवा पुरस्काराची अपेक्षा न ठेवता नि:स्वार्थीपणे सेवा करण्याचे व्रत आंगिकारले होते.[२१]

'हिंसाबंदी' हे गाडगे महाराज मिशनच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट होते. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने वाघबाबांनी स्वत: प्रयत्न केले होते. वाघबाबांनी हिंसाबंदीसाठी केलेले कार्य खालीलप्रमाणे -

| अ. | यात्रा ठिकाण | देवाचे नाव | तालुका | जिल्हा | हिंसाबंदी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | उकडगांव | म्हसोबा | श्रीगोंदा | अहमदनगर | ५०० बकरी |
| २ | बोरकळ | बहिरोबा | सातारा | सातारा | ५०० बकरी |
| ३ | पाटकळ | वडजाई | सातारा | सातारा | २५० बकरी |
| ४ | सेलवडी | खंडोबा | शाहपूर | ठाणे | २५० बकरी |
| ५ | उदीरखेड | मरीआई | वरोळा | प.खानदेश | २ रेडे, १ मेंढी, १ डुक्कर |

वरील ठिकाणी वाघबाबांनी हिंसाबंदी केली. त्यांच्या हिंसाबंदी कार्यातून प्राणीमात्राविषयी दया हा गुण दिसून येतो.[२२]

विश्वनाथ काशिनाथ वाघबाबांची सन २००० मध्ये गाडगे महाराज मिशन मुंबई च्या अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. त्यांनी अध्यक्षपदाच्या कालखंडात संस्थेला ऊर्जितावस्था आणण्यासाठी प्रयत्न केले. वाघबाबांनी मिशनमधील सेवकांनी गाडगेबाबांच्या तत्वप्रणालीप्रमाणे आचरण करण्यासाठी दहा नियम ठरवून दिले. ते नियम प्रत्येकाने आचरणात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि यातच प्रत्येकाच्या जीवनाचे सार्थक व मिशनचे हित आहे असे सांगितले. वाघबाबांनी सांगितलेले दहा नियम पुढीलप्रमाणे -

१. जुगार, दारू, व्यभिचार आदि दुर्व्यसनांपासून दूर राहीन.

२. घरीदारी अस्पृश्यता व जातपात पाळणार नाही.

३. लग्नाच्यावेळी हुंडा देणार किंवा घेणार नाही.

४. क्रूरपणे होणाऱ्या मुक्या प्राण्यांच्या हत्येस हातभार लावणार नाही.

५. माझ्या शक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांना व अडल्या नडलेल्यांना मदत करीन.

६. माझे घर, शरीर, मन, अंगण, आणि मिशन शाखा नेहमी स्वच्छ ठेवीन.

७. दीन, दु:खी, दलितांचे तसेच रंजल्या-गांजलेल्यांची सेवा करीन.

८. देवाधर्माच्या नावावर मुक्या प्राण्यांच्या हत्या करणार नाही.

९. कोणत्याही अंधश्रद्धेला बळी न पडता सेवाभाव सतत जागृत ठेवीन.

१०. सर्वधर्मसमभावाने वागेन व देशाशी एकनिष्ठ राहीन.[२३]

श्री. विश्वनाथ वाघबाबांनी अध्यक्षपदाच्या कालखंडात 'श्री संत गाडगे महाराज' या नावाने ढाकरमल, (जि. अमरावती), मुलवड (जि. नाशिक), दाभोळ (जि. ठाणे), बिजवडी (जि. सातारा), येळेवाडी (जि. सातारा), सावेडी (जि. अहमदनगर), गोंदवले बु॥ (जि. सातारा) इत्यादी ठिकाणी मिशनचा शाखाविस्तार घडवून आणला.[२४]

श्री. विश्वनाथ वाघबाबांनी आयुष्यभर श्री गाडगेबाबांच्या तत्व व ध्येयधोरणाप्रमाणे कार्य केले. त्यांनी कधीही प्रापंचिक मोहजालात स्वत:ला अडकवून घेतले नाही. स्वत:च्या पत्नीच्या मृत्यूदिवशी ही आपल्या कीर्तन कार्यात खंड पडू दिला नाही. विश्वनाथ वाघबाबांनी जीवनाच्या अखेर पर्यंत मिशनसेवक व सल्लागार म्हणून योग्य भूमिका बजावली. मिशनच्या या सेवाभावी व्यक्तीमत्वाचा मृत्यू दिनांक १३ जानेवारी २००६ रोजी झाला.[२५]

**श्री. जिजाबा कोंडिबा मोहिते -**

श्री. जिजाबा कोंडिबा मोहिते-पाटील हे गाडगे महाराज मिशनचे सुरूवातीपासूनचे एक प्रमुख कार्यकर्ते व आधारस्तंभ होते. त्यांचा जन्म दिनांक १५-१-१९१५ रोजी सांगली जिल्हयातील कडेगाव तालुक्यात सोहोली या गावी झाला. लहानपणी गाडगेबाबांचे कीर्तन ऐकले. त्या कीर्तनामुळे त्यांच्यावर गाडगेबाबांचा मोठा

प्रभाव पडला. त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने गाडगेबाबांचा लोभ संपादन केला होता. ते १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलन ही सहभागी झाले होते.[२६]

जिजाबा मोहिते-पाटील यांनी गाडगेबाबांचे विचार कृतीत आणण्यासाठी ब्रम्हपुरी ( ता.कोरेगांव ) या ठिकाणी गाडगे महाराज मिशन संचलित तीन शाखा सुरू केल्या. त्या शाखा म्हणजे -

१. श्री गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा, ब्रम्हपुरी, स्थापना.सन- १९६३.

२. श्री गाडगे महाराज माध्यमिक आश्रमशाळा ब्रम्हपुरी, स्थापना. सन-१९७४.

३. श्री गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह, ब्रम्हपुरी, स्थापना.सन-१९७६.

वरील शाखांची स्थापना करून त्यांनी आपले सेवा कार्य सुरू ठेवले. त्यांच्या प्रभावी कार्यकर्तृत्वामुळे त्यांना गाडगे महाराज मिशनमध्ये चेअरनन, खजिनदार, संचालक, आजीव सेवक अशी अनेक पदे दिली गेली होती. या पदावर असताना त्यांनी अत्यंत सचोटीने आपले कार्य केले. प्रामाणिकपणा व उत्तम रेकॉर्ड ठेवण्याचा आदर्श गुण त्यांच्याकडून शिकण्यासारखा होता.[२७]

जिजाबा मोहिते-पाटील हे गाडगे महाराज मिशनचे कीर्तनकार म्हणून ही प्रसिद्ध होते. त्यांनी आयुष्यभर कीर्तनाद्वारे दारूबंदी, साक्षरता प्रसार, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता प्रसार, जातीभेद उच्चाटन, हिंसाबंदी इत्यादी विषयांवर प्रबोधन करण्याचे कार्य केले. त्यांच्या कीर्तनप्रभावामुळे अनेक ठिकाणी हिंसाबंदी होण्यास मदत झाली. त्यांनी हिंसाबंदीसाठी केलेल्या कार्याचा तपशील -

| अ. | यात्रा ठिकाण | देवाचे नाव | तालुका | जिल्हा | हिंसाबंदी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोहोली | पीर | कडेगाव | सांगली | १00 बकरी |
| २ | करंडी | बहिरोबा | जावली | सातारा | ५00 बकरी |
| ३ | पोतरा | पीर | करमाळा | सोलापूर | १५0 बकरी |

वरील ठिकाणी हिंसाबंदीचे कार्य करून त्यांनी गाडगेबाबांचे 'अहिंसा' हे तत्व कृतीत आणल्याचे दिसून येते.[२८] जिजाबा मोहिते-पाटील यांनी सन १९६३ ते १९९४ पर्यंत श्री गाडगे महाराज मिशनमध्ये सेवाकार्य केले. सन १९९४ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.[२९]

**श्री. राजाराम सुखदेव घोंगटे :**

श्री संत गाडगे महाराज यांच्या सेवाकार्याने प्रेरित होऊन राजाराम घोंगटे मिशनमध्ये सहभागी झाले होते. त्यांचे वडिल सुखदेव घोंगटे गाडगे महाराज मिशनच्या सेवेत होते. राजाराम घोंगटे हे गाडगेबाबांचे सानिध्य लाभलेले मिशनचे एक सेवक होते. त्यांचा जन्म आव्हा, ता- मोताळा जि. बुलढाणा येथे झाला. जन्माच्या तिसऱ्याच दिवशी मातेचे छत्र हरपले. ते इयत्ता ७ वी झाल्यानंतर त्यांच्या वडीलांनी त्यांना गाडगे बाबांच्या सेवाकार्यासाठी समर्पित केले. त्यानंतर गाडगेबाबांनी त्यांची नाशिक धर्मशाळेत नियुक्ती केली. या ठिकाणी त्यांनी यात्रेकरूंना खोल्या देणे, भांडी देणे, साफसफाई करण्यापासून व्यवस्थापक पदापर्यंत काम केले. याच काळात त्यांनी एक विश्वासू, कर्तव्यदक्ष सेवक म्हणून नावलौकिक मिळवला.[३०] राजाराम घोंगटे यांनी इ. स. १९५४ ते १९५६ गाडगेबाबांच्या शेवटच्या कालखंडात गाडगेबाबांचा पत्रव्यवहार सांभाळला. पुढील काही काळ ते मुंबई, अमरावती या ठिकाणच्या धर्मशाळेत विश्वस्त म्हणून कार्यरत होते. इ. स. १९८२ मध्ये त्यांची श्री गाडगे महाराज मिशनच्या जनरल सेक्रेटरीपदी नियुक्ती झाली. त्यांनी यवतमाळ जिल्हयातील आदिवासी भागातील केळपूरच्या माध्यमिक आश्रमशाळेत काम करताना आदिवासी मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी विशेष प्रयत्न केले होते. तसेच मोरगांव, राळेगांव, घाटजी इत्यादी भागातील आदिवासींच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी रात्र मेळावे आयोजित करून रूग्णसहाय्यता शिबिर, नेत्रचिकित्सा शिबिरे घेतली. तसेच अंधश्रद्धा, दारूबंदी, हिंसाबंदी निर्मूलनाचे कीर्तन कार्यक्रम केले. त्यांच्या या सेवाकार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने सन १९९०-९१ चा 'आदिवासी सेवा' पुरस्कार त्यांना बहाल केला. इ. स. १९९० मध्ये त्यांची श्री गाडगे महाराज

मिशनच्या चेअरमनपदी नियुक्ती झाली ते नोव्हें २००८ पर्यंत म्हणजे मृत्यूपर्यंत या पदावर कार्यरत होते.

राजाराम घोंगटे यांना मिशनमध्ये केलेल्या सेवा कार्याबद्दल अनेक पुरस्कार मिळाले त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| | पुरस्काराचे नाव | वर्ष |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्राचा 'दलितमित्र' पुरस्कार | सन - २००१ |
| २. | गुणवंत बाबा प्रतिष्ठान, मुंबई चा 'सेवारत्न'पुरस्कार | सन - २००१ |
| ३. | दीवालीबेन मोहनलाल मेहता चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई. चा दीवालीबेन ॲवॉर्ड. | सन - २००१ |

वरील पुरस्कारावरून राजाराम घोंगटे यांचे मिशनमधील कार्य लक्षात येईल.[३१]

## श्री. तुकाराम धोंडिबा खांडवे -

तुकाराम धोंडिबा खांडवे हे गाडगे महाराज मिशन संचलित आश्रमशाळा राहुरी येथे संचालक म्हणून इ.स. १९५२ पासून कार्यरत आहेत. आजही ते मिशनमधील अनेक शाखांचे संचालक व मार्गदर्शक म्हणून कार्य पाहतात. त्याच्या पुढाकाराने राहुरी या ठिकाणी गाडगे महाराज मिशन संचलित चार शाखा सुरू झालेल्या आहेत. त्या शाखा पुढीलप्रमाणे -

१. श्री गाडगे महाराज आदिवासी आश्रमशाळा, राहुरी. स्थापना - इ.स.१९५४

२. श्री गाडगे महाराज पोस्ट बेसिक आश्रमशाळा, राहुरी. स्थापना -इ.स. १९७२

३. श्री संत गाडगे महाराज नवमहाराष्ट्र वसतिगृह, राहुरी. स्थापना - इ.स.१९७२

४. श्री गाडगे महाराज कन्याछात्र, राहुरी. स्थापना - १९७२.[३२]

तुकाराम खांडवे यांनी गाडगे महाराज मिशनमध्ये सन १९८२ ते २००० या कालखंडात सचिव म्हणून पदभार संभाळलेला होता. त्यानंतर ते सहखजिनदार पदावर कार्यरत आहेत. ते उत्तम कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी आदिवासी

समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा, बालविवाह, हिंसाबंदी, दारूबंदी रोखण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. तसेच त्यांनी गाडगे महाराज मिशनचे मुखपत्र 'श्री गाडगे बाबा' या त्रैमासिकाचे १८ वर्षे संपादक म्हणून कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने सन २००७ चा 'आदिवासी पुरस्कार' त्यांना दिला आहे. हा पुरस्कार त्यांना उपमुख्यमंत्री मा.ना. आर.आर.पाटील यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.[३३]

अशाप्रकारे गाडगे महाराज मिशनच्या केंद्रीय नेतृत्वामध्ये दादासाहेब देशमुख, यशवंतराव माने, विश्वनाथ वाघ, जिजाबा मोहिते-पाटील, राजाराम घोंगटे, तुकाराम खांडवे या व्यक्तींचा सिंहाचा वाटा असल्याचे दिसून येते. तसेच या व्यक्तींच्याशिवाय अनेकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मिशनच्या कामकाजाला हातभार लावलेला आहे. त्यांचा नामोउल्लेख करणे आवश्यक आहे. त्यामध्ये ना. स.माळी, यशवंत तुकाराम शिंदे (ताथवडा), प्र.मा.पाटील (ओतुर), कडुबुवा चौधरी (कुर्ला-मुंबई), विठ्ठल गायकर (साखरवाडी-सातारा), रघुनाथ राठोड ( नागपूर ), चरणदास उजाडे (गडचिरोली, चंद्रपूर), नागुदास सातपुते (उमदी-सांगली), आनंदराव पवार (भुसावळ जळगांव), नरेंद्र साबळे पाटील (अमरावती), बापुसाहेब देशमुख (अकोला), गोपाळशेठ केडीया ( यवतमाळा), मधुसुदन मोहिते (ब्रम्हपुरी-सातारा), शिवाजीराव महानवर (येळेवाडी जि.सातारा)[३४] इत्यादी अनेक पदाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये मिशनचे नेतृत्व केलेले दिसून येते.

## मिशनच्या केंद्रीय नेतृत्वाची वैशिष्ट्ये -

श्री गाडगे महाराज मिशनच्या केंद्रीय नेतृत्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

१. केंद्रीय नेतृत्वामधील अनेक व्यक्तींना श्री गाडगेबाबांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेला होता.

२. केंद्रीय नेतृत्वामधील अनेक व्यक्तींनी एकोणिसशे ब्येचाळीसच्या 'छोडो भारत' अंदोलनात सहभाग घेतलेला होता उदा.विश्वनाथ वाघ, यशवंतराव माने, जिजाबा मोहिते-पाटील...इत्यादी

३. अनुभवी आणि तज्ज्ञ व्यक्तींकडेच मिशनचे केंद्रीय नेतृत्व सोपविण्यात आल्याचे दिसून येते.

४. हिंसाबंदी, दारूबंदी, अस्पृश्यता निर्मूलन, हुंडीबंदी, शिक्षण प्रसार, रोग्यांची सेवा, आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास यासाठी केंद्रीय नेतृत्वाने मोलाचे कार्य केले आहे.

५. केंद्रीय नेतृत्वामधील बहुतेक व्यक्तींचा गाडगे महाराज मिशनचे प्रसिद्ध कीर्तनकार म्हणून नावलौकिक आहे. त्यांना शासनमान्यता आहे. उदा.यशवंतराव माने महाराज, विश्वनाथ वाघ, राजाराम घोंगटे, तुकाराम खांडवे इत्यादी.

६. केंद्रीय नेतृत्वामधील अनेक व्यक्ती 'दलितमित्र', 'आदिवासी सेवक' व 'श्री संत गाडगे महाराजसेवा' पुरस्काराने सन्मानित आहेत.

## मिशनचे स्थानिक नेतृत्व -

कोणत्याही संस्थेच्या विकासासाठी नेतृत्वाची आवश्यकता असते. नेतृत्वाचे अनेक प्रकार असतात.स्थानिक नेतृत्व हा श्री गाडगे महाराज मिशनचा अविभाज्य घटक आहे. स्थानिक नेतृत्वामधूनच केंद्रीय नेतृत्वाची उभारणी होत असते. त्यामुळे श्री गाडगे महाराज मिशनचे स्थानिक नेतृत्व कशा स्वरूपाचे आहे याचा आढावा घेणे गरजेचे वाटते.

'श्री गाडगे महाराज मिशन' ही सेवाभावी संस्था आहे. या संस्थेने गेल्या ५० वर्षात अनेक शैक्षणिक व सामाजिक शाखा-उपशाखा सुरू केलेल्या आहेत. श्री गाडगे महाराज मिशनच्या प्रशासनाने या शाखा-उपशाखांचे कार्य सुरळीतपणे आणि प्रभाविपणे चालविण्याची जबाबदारी स्थानिक नेतृत्वाकडे सोपविली आहे.

मिशनच्या स्थानिक नेतृत्वामध्ये मिशन संचलित शाखांचे संचालक, व्यवस्थापक, विश्वस्त व इतर उल्लेखनीय कार्य करण्याऱ्या नेतृत्वाची माहिती पुढीलप्रमाणे -

**श्री. ओंकारनाथ जोशी -**

ओंकारनाथ जोशी श्री गाडगेबाबांच्या विचारप्रभावामुळे सन १९५३ मध्ये मिशनच्या कार्यात सहभागी झाले. त्यांनी सुरूवातीस ३ वर्षे गाडगे बाबांचा पत्रव्यवहार सांभाळला. गाडगेबाबांच्या मृत्यूनंतर त्यांनी नाशिक, मुंबई, मुर्तिजापूर, ओतुर या शाखेत मार्गदर्शक म्हणून कार्य केले. मिशनचा प्रामाणिक सेवक कसा असावा हे त्यांनी स्वत:च्या कृतीद्वारे दाखवून दिले. त्यांनी मिशनच्या शाखांना आपले घर मानले. अनाथ मुलांना आपल्या कार्याचे दैवत मानले. ते मिशनच्या कार्यासाठी आयुष्यभर अविवाहित राहिले. ओंकारनाथ जोशी यांनी श्री गाडगे महाराज मिशनचे मुखपत्र 'श्री गाडगे महाराज त्रैमासिक' याचे अनेक वर्षे संपादक म्हणून कार्य पाहिले. तसेच गाडगेबाबांचे वेगवेगळया प्रकारचे फोटो, गाडगेबाबांच्यावरील लेखसंग्रह, कविता इत्यादी प्रकाशित करून श्री गाडगे महाराज मिशन प्रकाशन समितीला मोलाचे सहकार्य केले. त्यांनी गाडगेबाबांचे संदेश देशपातळीवर पोहचविण्याचे कार्य केले. त्यांनी ओंकारनाथ जोशीबाबांचे मिशनमधील सर्वात उल्लेखनीय कार्य म्हणजे त्यांनी मिशनचे बोधचिन्ह तयार केले. त्यांनी गाडगेबाबांच्या जीवनावरील 'माधुकरी' हा गीतसंग्रह व गाडगेबाबांचे 'पसायदान' लिहिले आहे. ते मिशनमध्ये कार्यरत असतानाच दि.१२.३.०५ मध्ये त्यांना देवाज्ञा झाली.[३५]

**श्री. गोपाळराव बापुरावजी नाचवणे -**

गोपाळ बापुरावजी नाचवणे यांनी श्री गाडगे महाराज मिशनमध्ये कार्यकारिणीचे सदस्य म्हणून अनेक वर्षे पदभार सांभाळलेला आहे. त्यांनी दाभोळ (ठाणे) बेलवड, मुरवड (नाशिक) येथील दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा स्थापन केल्या. या आश्रमशाळांचे संचालक व व्यवस्थापक म्हणूनही त्यांनी कार्य केले. ते गाडगे महाराज मिशनचे प्रसिद्ध कीर्तनकार होते. त्यांनी आपल्या कीर्तनद्वारे समाजप्रबोधन करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे.[३६]

**श्री. उत्तमराव अच्युतराव देशमुख -**

दर्यापूर, (अमरावती) येथील मिशन संचलित निराधार बालकाश्रम, नागरवाडी (अमरावती) येथील आश्रमशाळा यांचे सुयोग्य नियंत्रण व नियमन करणारे तडफदार नेतृत्व म्हणजे उत्तमराव देशमुख होय. त्यांनी मिशनमध्ये अनेक पदे भूषविली आहेत. त्यांचा मिशनमधील नवनवीन योजनांमध्ये महत्वपूर्ण सहभाग असतो. त्यांनी विशेषत: आदिवासी समाजासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्याबद्दल त्यांना सन १९९८-९९ चा महाराष्ट्र शासनाचा 'आदिवासी सेवक' पुरस्कार देण्यात आला आहे.[३७]

**श्री. प्रल्हाद मारुती पाटील -**

मध्य महाराष्ट्रातील पुणे-जुन्नर व उत्तर महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्हयात मिशन संचलित शैक्षणिक शाखांचे प्रभावी नेतृत्व करणारी अशी ही व्यक्ती आहे. त्यांनी मिशनमध्ये सचिवपदाची धुराही सांभाळलेली आहे. ते सतत मिशनमध्ये नवनवीन योजना राबविण्यासाठी अग्रभागी असतात.[३८]

**श्री. एकनाथ जगन्नाथ ठाकूर -**

हे मिशनमधील सेवाभावी व्यक्तीमत्व आहे. त्यांच्या अंगभूत गुणांमुळे मिशन प्रशासनाने सन १९८२ मध्ये श्री गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट, भायखळा येथे व्यवस्थापकपदी त्यांची नियुक्ती केली. या काळात त्यांनी धर्मशाळेच्या प्रशासनात मूलभूत सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. एकनाथ ठाकूर यांची सन १९९८ मध्ये श्री गाडगे महाराज मिशनच्या खजिनदारपदी एकमताने निवड करण्यात आली. सध्या ते याच पदावर कार्यरत आहेत.[३९]

**श्री. अशोक यशवंतराव देशमुख -**

अशोकराव देशमुख हे श्री गाडगे महाराज मिशन मुंबई संचलित श्री गाडगे महाराज आश्रमशाळा, मुलवड, ता. पेठ, जि. नाशिक येथे संचालक व श्री गाडगे महाराज धर्मशाळा नाशिक येथे व्यवस्थापक म्हणून कार्य पाहतात. ते मिशनचे तडफदार कार्यकर्ते आहेत. मुलवड सारख्या अतिदुर्गम भागात काम करणे फार अवघड होते. तरी देखील

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

तेथील परिस्थितीवर मात करून त्यांनी आदर्श आश्रमशाळा चालवून दाखविली. ते नेहमी सामाजिक कार्यात हिरिरीने भाग घेत असतात. आदिवासी समाजात आढळणारी अंधश्रद्धा, निरक्षरता, व्यसनाधिनता निर्मूलनास त्यांनी प्राधान्य दिल्याचे दिसून येते. त्यांनी नाशिकमध्ये ग्रामस्वच्छता अभियानासाठी पुढाकार घेतला होता. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाने सन २००६-०७ चा 'आदिवासी सेवक' पुरस्कार देऊन गौरव केला आहे.[४०]

### श्री. कडुबुवा झिपरू चौधरी -

कडुबुवा चौधरी हे सुरूवातीपासून श्री गाडगे महाराज मिशनमध्ये कार्यरत होते. सन १९४२ पासून ते आपले घरदार सोडून गाडगेबाबांच्या सहवासात आले. त्यांनी गाडगेबाबांची शिकवण आत्मसात केली. ते १० वर्षे गाडगेबाबांच्याबरोबर कीर्तन करत संपूर्ण महाराष्ट्रभर फिरले. ते मिशनच्या कार्यकारी मंडळात अनेक वर्षे सभासद होते. त्यांनी काही काळ कुर्ला-मुंबई येथील मागासवर्गीय वसतिगृहाचे संचालक म्हणून कार्य पाहिले होते. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना 'दलितमित्र' हा पुरस्कार मिळालेला आहे.[४१]

वरील व्यक्तींनी श्री गाडगे महराज मिशनच्या स्थानिक नेतृत्वामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्याशिवाय इतर अनेक व्यक्तींनी गाडगे महाराज मिशन संचलित शाखा-उपशाखांचे नेतृत्व केलेले आहे. त्यांचा नामोउल्लेख करणे गरजेचे वाटते. यामध्ये गाडगे महाराज मिशनचे संचालक नारायण ढाणकीकर ( सिताखंडी ), कृष्णराव बापूराव नाचवणे (दाभोळ), ज्ञानदेव वासुदेव पाटील (ढकरमल), सतीश सोनवणे (बेरवळ), तुकाराम धोंडिबा खांडवे, (राहुरी), विश्वनाथ वाघ (भिवाळी) ,प्रल्हाद पाटील (ओतुर), उत्तमराव देशमुख (नागरवाडी) इत्यादी व्यक्तींनी महाराज मिशन संचलित आदिवासी आश्रमशाळेचे स्थानिक नेतृत्व केलेले दिसून येते.[४२]

तसेच सूर्यकांत माने (गोंदवले बु ||), मधुसुदन मोहिते (ब्रम्हपुरी मुरी-सातारा), शिवाजीराव महानवर (येळेवाडी-बिजवडी), मारूती शिंदे (ताथवडा), रामचंद्र पोतदार (वरवंडी), रामनाथ पाटील (वर्धा), विजय औटी (टाकळीकाझी), भास्कर

साठे (भातसई ), इत्यादींनी श्री गाडगे महाराज मिशन संचलित पोस्ट बेसिक आश्रमशाळा व भटक्या विमुक्त जाती-जामातीच्या मुलांच्या आश्रमशाळेचे नेतृत्व केलेले आहे.[४३] त्याचबरोबर नारायण माळी (पंढरपूर ), फकीरा घानोकार (दहिगांव), ज्ञानेश्वर चौधरी (कुर्ला-मुंबई ), गोकुळ खंडु सोनवणे (भुसावळ) इत्यादी व्यक्तींनी संचलित बालकमंदिर, निराधार बालकाश्रम व विद्यार्थी वसतिगृहांचे नेतृत्व केलेले आहे.[४४]

श्रीमती प्रभाताई वसंतराव ओरपाडकर ( मिरज ), श्रीमती जिजाबाई सुभाष चौधरी, जुन्नर ( पुणे ), श्रीमती चंद्रकला हुलावळे राहुरी ( अहमदनगर ), श्रीमती नंदा प्रभाकर कवडे भानसहिवरे (अहमदनगर), श्रीमती आशालता धोंडी लांजूळकर ओतुर, (पुणे), इत्यादी स्त्रियांनी श्री गाडगे महाराज मिशन संचलित कन्याछात्रालये, पाळणाघरे आणि मुलींची वसतिगृहे यांचे स्थानिक नेतृत्व केलेले दिसून येते.[४५]

**समारोप -**

अशाप्रकारे गाडगे महाराज मिशनच्या विकासासाठी अनेक सेवाभावी व्यक्तींनी व मिशनच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय व स्थानिक पातळीवर नेतृत्व केले आहे. त्यांच्या कुशल नेतृत्वामुळे गाडगे महाराज मिशनचा संपूर्ण महाराष्ट्रभर विकास होण्यास मदत झाली.

## संदर्भ साधने :


१. खांडवे .तु .धों . (संपा .), श्री गाडगेबाबा त्रैमासिक ( आक्टों ., नोव्हें, डिसें .), १९९८, पृ. - ३४ .

२. श्री गाडगे महाराज मिशन सुवर्णमहोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ-३५ .

३. खांडवे तु .धों . ( संपा .), श्री गाडगेबाबा त्रैमासिक ( आक्टों, नोव्हें, डिसें ), २००२ पृ. - १३ .

४. श्री गाडगे महाराज मिशन सुवर्णमहोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ- ३५ .

५. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९२-९३, पृ. - ४१ .

६. श्री गाडगे महाराज मिशन सुवर्णमहोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ. - १६-१८ .

७. श्री गाडगे महाराज मिशन ध्येय व धोरण आणि नियम व कानुन, १९८७, पृ. - १, १२ .

८. खांडवे तु .धों . (संपा .), श्री गाडगेबाबा त्रैमासिक (आक्टों, नाव्हें, डिसें ), २००२, पृ.- १३, १४ .

९. दांडेकर गो .नी ., श्री गाडगे महाराज, पृ. - १४६ .

१०. पाटील .प .ह ., तोचि साधू ओळखावा, २००३, पृ.- १० .

११. जोशी ओंकारनाथ ( संपा .), श्री गाडगे बाबा त्रैमासिक, ( एप्रिल, मे, जून ) १९८५, पृ. - २८ .

१२. श्री गाडगे महाराज मिशन सुवर्णमहोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ. - १६, १७, १८ .

१३. कित्ता, पृ. - ५१, ५४ .

१४. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९२-९३ पृ. - ४५, ४६ .

१५. श्री गाडगे महाराज मिशन, सुवर्णमहोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ. - २५ .

१६. श्री गाडगे महाराज मिशन, मुंबई, अहवाल सन-१९९२-९३, पृ. - ४६, ४७.

१७. श्री गाडगे महाराज मिशन सुवर्ण महोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ.९५ व यशवंतराव माने ( कार्यकारी अध्यक्ष गाडगे महाराज मिशन ) यांच्याशी केलेली चर्चा.

१८. चऱ्हाटे गुणवंतराव., गाडगेबाबांच्या सानिध्यात, २००४, पृ. - १०२, १०३.

१९. दांडेकर गो. नी., उपरोक्त पृ. - १४६, १४७.

२०. पाटील प. ह., उपरोक्त पृ. - १०.

२१. श्री गाडगे महाराज मिशन सुवर्णमहोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ-१४३.

२२. कित्ता, पृ. - ५१, ५७.

२३. खांडवे तु.धों.(संपा.), श्री गाडगेबाबा त्रैमासिक, ( आक्टों, नोव्हें, डिसें ), १९९७ पृ. - १५.

२४. श्री गाडगे महाराज मिशन सुवर्णमहोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ.-१८.

२५. पाटील प.ह. ( संपा.), मराठी देश, विशेषांक, २००६, पृ.- १२.

२६. दांडेकर गो.नी., उपरोक्त, पृ. - १४७.

२७. श्री गाडगे महाराज मिशन, सुवर्णमहोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ.- ८४, ८५ .

२८. कित्ता, पृ. - ५२, ५३.

२९. कित्ता, पृ.- ८५.

३०. खांडवे तु.धों. ( संपा.), श्री गाडगेबाबा त्रैमासिक, ( आक्टों, नोव्हें, डिसें ), २००२, पृ. - १५.

३१. श्री गाडगे महाराज मिशन सुवर्णमहोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ. - ३९,४०.

३२. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९१-९२, पृ.- २, ३, ४.

३३. खांडवे तु.धों. (संपा.), श्री गाडगेबाबा त्रैमासिक, (एपिल, मे, जून) २००७, पृ -१५.

३४. जोशी ओंकारनाथ (संपा.), श्री गाडगेबाबा (त्रैमासिक) मार्च, १९८३ पृ.-२५.

३५. श्री गाडगे महाराज मिशन सुवर्णमहोत्सव विशेषांक, सन १९५२-२००२, पृ. - ३७, ३८.

३६. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल - १९९२-९३ पृ. - ४२.

३७. खांडवे तु.धों. (संपा.) श्री गाडगे त्रैमासिक, (आक्टों, नोव्हें, डिसें), १९९८ पृ. -४८.

३८. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९२-९३ पृ.- १३

३९. खांडवे तु.धों (संपा.), श्री गाडगेबाबा त्रैमासिक, (जूलै,ऑगस्ट, सप्टेंबर)

४०. खांडवे तु.धो. (संपा.), श्री गाडगेबाबा त्रैमासिक, (एप्रिल, मे, जून), २००७, पृ. - १५.

४१. जोशी ओंकारनाथ (संपा.), श्री गाडगेबाबा त्रैमासिक, (एप्रिल, मे, जून) १९८५, पृ. - २९.

४२. श्री गाडगे महाराज मिशन मुंबई अहवाल, सन १९९२-९३, पृ.- २१

४३. कित्ता, पृ. - २२, २३.

४४. कित्ता, पृ. - २३, २४.

४५. कित्ता, पृ. - २५.